**मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, जुनी एस.बी.आय. कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, सर्व्हे न. १११ व ११५, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर येथे ३३.०३ हे. क्षेत्रात लॅटेराईट उत्खनन १,२५,००० टन प्रतिवर्ष ते ६,१९,०३०.४० टन प्रतिवर्ष विस्तारीकरण प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **०३/११/२०२०** |
| **वेळ** | **:** | **दुपारी १२:१० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **प्रकल्प स्थळ, मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इंडस्ट्रीज, स. नं. १११ व ११५, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर.** |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, जुनी एस.बी.आय. कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, सर्व्हे न. १११ व ११५, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर येथे ३३.०३ हे. क्षेत्रात लॅटेराईट उत्खनन १,२५,००० टन प्रतिवर्ष ते ६,१९,०३०.४० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेच्या लॅटेराईट खाण प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना अर्ज सादर केल्यानंतर राज्यस्तरीय पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEIAA-I) यांच्या १३९ वी बैठक दि. २८/०९/२०१८ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण मंजूरी प्रदान केली. सदर विस्तारीकरण प्रकल्पाकरिता पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना अर्ज सादर केल्यानंतर राज्यस्तरीय पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEIAA-I) यांच्या १७८ वी बैठक दि. १८/०२/२०२० रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. ०३/११/२०२० ही तारीख निश्चित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. ३०/०९/२०२० रोजीच्या मराठी दैनिक ‘‘लोकसत्ता’’ व इंग्रजी दैनिक ‘‘द हितवाद’’ मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
५. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
६. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
७. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
८. तहसिल कार्यालय, जिवती, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
९. पंचायत समिती कार्यालय, जिवती, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१०. गट-ग्रामपंचायत कार्यालय पिट्टीगुडा, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
११. गट-ग्रामपंचायत कार्यालय मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१२. गट-ग्रामपंचायत कार्यालय, नांदप्पा, ता. जिवती, जि. चंद्रपूर.
१३. गट-ग्रामपंचायत कार्यालय, अंबेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर.

वरील अनुक्रमांक ४ ते १३ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इंडस्ट्रीज, स. नं. १११ व ११५, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-५८/२०२० दि. २३/१०/२०२०-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२०१०२३-FTS-००९१, **सहपत्र-१**)

१) श्री. मनोहर गव्हाड, - **अध्यक्ष,**
अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

२) श्री अशोक करे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. अजित पाटील, - **समन्वयक**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न (एकूण ०५) **सहपत्र-२** प्रमाणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) श्री. दिपक दिक्षीत, प्रकृती फाउण्डेशन, चंद्रपूर यांचे पत्र दि. २७/१०/२०२०.
२) उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे पत्र दि. ०३/११/२०२०.
३) श्री. बी.पी ब्राम्हणे, रा. बापटनगर, हॉटेल सिताराचे मागे, चंद्रपूर यांचे ईमेलपत्र दि. २६/१०/२०२०.
४) श्री. वूटकुरी सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी तथा अध्यक्ष, धरिथ्री पर्यावरणा परिरक्षणा संस्था, नालगोंडा, तेलंगणा राज्य यांचे ईमेलपत्र दि. ०१/११/२०२०.
५) यमुनाबाई गायकवाड व २ इतर यांचे पत्र दि. ०३/११/२०२०.

जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट **सहपत्र-३** प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी उपस्थित जनसमुदायास मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, जुनी एस.बी.आय. कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर यांच्या प्रस्तावित मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इण्डसट्रीज, सर्व्हे न. १११ व ११५, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर येथे ३३.०३ हे. क्षेत्रात लॅटेराईट उत्खनन १,२५,००० टन प्रतिवर्ष ते ६,१९,०३०.४० टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमतेच्या लॅटेराईट खाण प्रकल्पाच्या वाढीव उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व

हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकातर्फे राजेश मानकर, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) <u>श्री. लक्ष्मण राठोड, माथाडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेले उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्या गावाला काय फायदे मिळतील? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे प्रस्तावित प्रकल्प |

| | | |
|---|---|---|
| | | हा विस्तारीकरण प्रकल्प असून यामध्ये प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढविण्याबाबत सदर पर्यावरण विषय जाहीर जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. लॅटेराईट खनिजाच्या उत्खननानंतर जवळपासच्या सिमेंट कारखान्यांपर्यंत वाहतूकीकरिता परिसरातील वाहनांचाच वापर करण्यात येत आहे ज्यामुळे स्थानिक बेराजगारांना रोजगार प्राप्त झाला आहे. तसेच पर्यावरणी व सामाजिक जबाबदारी (CER) अंतर्गत रू. १,८०,०००/- च्या निधीची तरतूद केलेली आहे. निधीच्या वर्गीकरणानूसार ा.म. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या मान्यतेनंतर निधी खर्च करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पाच्या सभोवतालच्या गावांना याचा फायदा होईल. |

२) **श्री. सुनिल आडे, माथाडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर प्रकल्पात स्थानिक नागरीकांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. त्यात कुशल-अकुशल कामगारांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. जर कुशल कामगारांचा तुटवडा भासला किंवा प्रकल्प प्रवर्तकांना एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील कुशल कामगाराचर आवश्यकता झाली व ती व्यक्ती प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात उपलब्ध नसल्यास तरच बाहेरील व्यक्तिला रोजगार देण्यात येईल अन्यथा स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक देखील उपरोक्त नमूद मुद्याचे समर्थन करतात. |

३) **श्री. अभय शिंदे, पल्लेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक लोकांना कोण-कोणते फायदे मिळतील व ते कशा पद्धतीने मिळतील? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे प्रस्तावित प्रकल्प हा विस्तारीकरण प्रकल्प असून यामध्ये प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढविण्याबाबत सदर पर्यावरण विषय जाहीर जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. लॅटेराईट खनिजाच्या उत्खननानंतर जवळपासच्या सिमेंट कारखान्यांपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | | वाहतूकीकरिता परिसरातील वाहनांचाच वापर करण्यात येत आहे ज्यामुळे स्थानिक बेराजगारांना रोजगार प्राप्त झाला आहे. तसेच पर्यावरणी व सामाजिक जबाबदारी (CER) अंतर्गत रू. १,८०,०००/- च्या निधीची तरतूद केलेली आहे. निधीच्या वर्गीकरणानूसार ा.म. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या मान्यतेनंतर निधी खर्च करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पाच्या सभोवतालच्या गावांना याचा फायदा होईल. |

४) **श्री. सय्यद सादिक, सामाजिक कार्यकर्ता, मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे झाडांसाठी काय व्यवस्था करण्यात येणार आहे? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाच्या सादरीकरणादरम्यन सांगितल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी आधीच हरीत पट्टा विकसित केलेला आहे व त्याछायाचित्रे देखील सादरीकरणादरम्यान दाखविण्यात आलेली आहेत. तसेच प्रस्तावित वृक्षारोपणाबाबतची माहिती देखील सादरकरणादरम्यान देण्यात आलेली आहे. प्रकल्पातून उत्खननादरम्यान होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरिता अंदाजे २९००० झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे व प्रकल्प प्रवर्तक आश्वासित करतात की यामुळे प्रदूषणावर आळा घालण्यास मदत होईल. |

५) **श्री. शेख सलीम, माजी सरपंच, अंबेझरी ग्रामपंचायत, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पामुळे परिसरातील बेरोजगारांना विपुल प्रमाणात रोजगार प्राप्त झालेला आहे जसे की, काही तरूणांना JCB ड्रायव्हरचा रोजगार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे व प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा, ही विनंती. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, आपण केलेल्या समर्थनाबद्दल मी आभारी आहे. |

६) **श्री. रामराव राठोड, उप-सरपंच, ग्रामपंचायत अंबेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाण प्रकल्पामूळे जो गौण खनिज विकास निधी होणार तो अंबेझरी ग्रामपंचायतीला मिळणार काय? | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री खनिज कल्याण योजना राबविली जाते. या अंतर्गत जिल्ह्यातील खनिज उत्खननातून शासनाला मिळाणारा खनिज विकास निधी जमा केल्या जातो व याबाबत खनिकर्म विभागाच्या अंतर्गत यावर लक्ष ठेवण्यात येते. यामध्ये जिल्ह्याचे मा. पालकमंत्री हे सदर समितीचे अध्यक्ष असतात व मा. जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असतात. निधी जमा झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण करण्यात येते व सदर निधी पर्यावरण, आरोग्य, स्वच्छता व इतर विकास कामे याकरिता खर्च करण्यात येतो. प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे परिसरात कोणत्या प्रकारे नूकसान झाले आहे याचा विचार करूनच खनिज विकास निधीचे वाटप केले जाते व त्याबाबत मा. पालकमंत्री व मा. जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत जिल्हास्तरावर निर्णय घेतला जातो. |

७) **श्री. विठ्ठल चव्हाण, पाटण, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित मे. रॉयल पॉटरी सिरॅमिक्स इंडस्ट्रीज प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला मान्यता देण्यात यावी जेणेकरून परिसरातील व जिवती तालुक्यतील सुशिक्षित बेरोजगार युवक/युवतींना विपुल प्रमाणात रोजगाराच्या संधी प्राप्त होतील. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर प्रकल्पात स्थानिक नागरीकांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. त्यात कुशल-अकुशल कामगारांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. जर कुशल कामगारांचा तुटवडा भासला किंवा प्रकल्प प्रवर्तकांना एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील कुशल कामगाराचर आवश्यकता झाली व ती व्यक्ती प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात उपलब्ध नसल्यास तरच बाहेरील व्यक्तिला रोजगार देण्यात येईल अन्यथा स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक देखील उपरोक्त नमूद मुद्याचे समर्थन करतात. |

८) **श्री. लाला शेख, उप-सरपंच, ग्रामपंचायत मारकागोंडी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित खाण प्रकल्पामुळे परिसरातील व जिवती तालुक्यतील सुशिक्षित बेरोजगार युवक/युवतींना रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत परंतु आजपावेतो आमच्या ग्रामपंचायतीला खनिज विकास निधी प्राप्त झालेला नाही व CSR निधी देखील मिळाला नाही. सदर दोन्ही निधी आमच्या ग्रामपंचायतीला कधी प्राप्त होतील याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी सांगावे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदरील प्रकल्पात CSR निधीची तरतूद प्रकल्पाच्या एकूण गुंतणूकीपैकी फक्त एक टक्के आहे कारण हा विस्तारीकरण प्रकल्प आहे. मुळात केंद्र शासनाने CSR रद्दबातल ठरविलेला असून त्या ऐवजी सामुदायिक पर्यावरणीय जबाबदारी (CER) अंमलात आणलेला आहे. ज्यामध्ये नविन प्रकल्प असल्यास प्रकल्पाच्या एकूण गुंतवणूकीपैकी दोन टक्क्यांची तरतूद सामुदायिक पर्यावरणीय जबाबदारी (CER) निधीमध्ये करण्याचे बंधनकारक आहे व विस्तारीकरण प्रकल्प असल्यास प्रकल्पाच्या एकूण गुंतणूकीपैकी फक्त एक टक्के रक्कमेची तरतूद सामुदायिक पर्यावरणीय जबाबदारी (CER) मध्ये करण्याचे बंधनकारक आहे. |

९) **श्री. बंडु राठोड, पल्लेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रकल्पाची जाहीर जनसुनावणी असल्याची जाहीरातीची माहिती परिसरातील संपूर्ण नागरीकांना ग्रामीण भाग असल्याकारणाने मिळाली नाही. सदर प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. तसेच आजु-बाजूच्या परिसरातील नागरीकांनादेखील या प्रकल्पामुळे फायदा झालेला आहे. परंतु आमच्या उप-सरपंचांनी सांगितल्याप्रमाणे पेसा कायदा अंमलात आल्यामुळे गौणखनिजावर आमचा अधिकार आहे. खनिज विकास निधी ग्रामपंचायतीला शासनातर्फे प्राप्त झाल्यास ग्रामपंचायत त्याचा उपयोग गावाच्या विकासकामाकरिता करू शकते व त्यामुळे गावाचा विकास होईल. सदर प्रस्तावित प्रकल्पाला विरोध नाही परंतु खनिज विकास निधी ग्रामपंचायतीला प्राप्त झाला पाहिजे हीच आमची मागणी आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री खनिज कल्याण योजना राबविली जाते. या अंतर्गत जिल्ह्यातील खनिज उत्खननातून शासनाला मिळाणारा खनिज विकास निधी जमा केल्या जातो व याबाबत खनिकर्म विभागाच्या अंतर्गत यावर लक्ष ठेवण्यात येते. यामध्ये जिल्ह्याचे मा. पालकमंत्री हे सदर समितीचे अध्यक्ष असतात व मा. जिल्हाधिकारी हे सदस्य सचिव असतात. निधी जमा झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण करण्यात येते व सदर निधी पर्यावरण, आरोग्य, स्वच्छता व इतर विकास कामे याकरिता खर्च करण्यात येतो. प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे परिसरात कोणत्या प्रकारे नूकसान झाले आहे याचा विचार करूनच खनिज विकास निधीचे वाटप केले जाते व त्याबाबत मा. पालकमंत्री व मा. जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत जिल्हास्तरावर निर्णय घोतला जातो. |

१०) **श्री. राजाराम आत्राम, बेलगाम, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर प्रकल्पात स्थानिक नागरीकांनाच प्राधान्य देण्यात आले आहे. त्यात कुशल-अकुशल कामगारांचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. जर कुशल कामगारांचा तुटवडा भासला किंवा प्रकल्प प्रवर्तकांना एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील कुशल कामगाराचर आवश्यकता झाली व ती व्यक्ती प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात उपलब्ध नसल्यास तरच बाहेरील व्यक्तिला रोजगार देण्यात येईल अन्यथा स्थानिकांनाच रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक देखील उपरोक्त नमूद मुद्याचे समर्थन करतात. |

११) **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, ता. जि. हैदराबाद, तेलंगणा:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पाला माझे समर्थन आहे. जनसुनावणी समितीला विनंती आहे की, सदर प्रकल्पास कोणत्याही कठोर अटी व शर्थींशिवाय परवानगी देण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकाच्यावतीने सदर विस्तारीकरण प्रकल्पास समर्थन दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. |

१२) **श्री. सुरेश केंद्रे, अंबेझरी, ता. जिवती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पाला माझे समर्थन जाहीर करतो. येथे स्थानिक नागरीकांना प्रकल्पामुळे भरपूर फायदा झालेला आहे. पर्यावरण विषय जाहीर जनसुनावणी समितीला विनंती करतो की, हे क्षेत्र दुर्गम अतिदुर्गम भागात मोडत असल्याने जर खनिज विकास निधी सरसकट ग्रामपंचायतीला प्राप्त झाला तर या क्षेत्राचा विकास होण्यास फार मदत होईल. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकाच्यावतीने सदर विस्तारीकरण प्रकल्पास समर्थन दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकलपामुळे परिसरातील गावकऱ्यांना फायदा होत आहे. या परिसरात उत्पन्नाकरिता फक्त शेतीचेच साधन उपलब्ध होते. प्रकल्पामुळे स्थानिक नागरीकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत व त्यामुळे त्यांच्या परिवाराच्या उदर्निवाहाचा मार्ग मोकळा होत आहे. |

१३) **श्री. अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकाने पाण्याच्या उपलब्धतेबाबत माहिती द्यावी. तसेच केंद्रीय भू-जल प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे किंवा कसे? | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, केंद्रीय भू-जल प्राधिकरण यांचेकडून घरगुती वापरासाठी ४.५ किलोलिटर/प्रतिदिन पाण्याचा वापर करण्याची परवानगी मिळालेली आहे. औद्योगिक वापरासाठी जसे की पाणी फवारणीसाठी गावातील पाण्याच्या टँकरचा वापर करून रस्त्यावर पाणी फवारणी केली जाईल. केंद्रीय भू-जल प्राधिकरणाचे भू-जलाचा वापर करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(अजित पाटील)** | **(अशोक करे)** | **(मनोहर गव्हाड)** |
| समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |